जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
E 1 JUN 2017
महाराष्ट्र टाईम्स

# आजपासून 'आव्हान २०१७'



**म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर**

शिवाजी विद्यापीठात आजपासून (दि.१) 'आव्हान-२०१७' या दहा दिवसीय राज्यस्तरीय आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण शिबिरास सुरवात होत आहे. त्यात राज्यभरातील १८ विद्यापीठांमधील सुमारे १२२२ राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक विद्यार्थी सहभागी होतील, अशी माहिती कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी बुधवारी पत्रकार परिषदेत दिली.

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, 'प्रशिक्षण शिबिरास आज सकाळी ९ वाजता प्रारंभ होईल. उद्या, शुक्रवारी सायंकाळी ४ वाजता कोल्हापूर परिक्षेत्राचे पोलिस महानिरीक्षक विश्वास नांगरे - पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत उदघाटन कार्यक्रम होईल. १० जूनला शिबिराच्या सांगता कार्यक्रमास राज्यपाल तथा कुलपती विद्यासागर राव प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहतील. अखेरच्या दिवशी शिबिरार्थींची प्रशिक्षणावर आधारित शहरातून रॅली निघेल. प्रशिक्षणासाठी राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाचे (एनडीआरएफ) चाळीस प्रशिक्षक दाखल झालेत. शिबिरार्थींची ऑनलाइन नोंदणी करण्यात आली. प्रत्येक सहभागी शिबिरार्थीला बारकोड असणारे ओळखपत्र देण्यात येईल. त्याशिवाय 'आव्हान-२०१७' नावानेच ॲन्ड्रॉईड मोबाईल ॲप्लीकेशनही तयार केले.' यावेळी प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, प्रभारी वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक डॉ. डी.के. गायकवाड, डॉ. जे. पी. जाधव, डॉ. सुमेधा साळुंखे, विश्वजीत देसाई आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष

- 1 JUN 2017 लोकमत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठात आजपासून 'आव्हान-२०१७' शिबिरास प्रारंभ

## राज्यभरातील १८ विद्यापीठांमधील १२२२ स्वयंसेवक सहभागी होणार

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात आज, गुरुवारपासून 'आव्हान-२०१७' या दहादिवसीय राज्यस्तरीय आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण शिबिरास प्रारंभ होत आहे. राज्यभरातील १८ विद्यापीठांमधील सुमारे १२२२ राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक या शिबिरात सहभागी होणार आहेत, अशी माहिती कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांनी बुधवारी आयोजित पत्रकार परिषदेत दिली.

कुलगुरु डॉ. शिंदे म्हणाले, प्रशिक्षण शिबिरास गुरुवारी (दि. १) सकाळी नऊ वाजल्यापासून प्रारंभ होत असला तरी औपचारिक उद्घाटन समारंभ शुक्रवारी (दि. २) दुपारी चार वाजता कोल्हापूर परिक्षेत्राचे पोलीस महानिरीक्षक विश्वास नांगरे-पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे. शनिवारी (दि. १०) शिबिराच्या समारोपप्रसंगी महाराष्ट्राचे राज्यपाल तथा कुलपती विद्यासागर राव उपस्थित राहणार आहेत. अखेरच्या दिवशी शिबिरार्थींची त्यांच्या प्रशिक्षणावर आधारित रॅलीही शहरातून काढण्यात येणार आहे. शिबिरात प्रशिक्षण देण्यासाठी राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाचे (एन.डी.आर.एफ.) ४० प्रशिक्षक दाखल झाले आहेत. दहा दिवसांत विविध आपत्तींच्या व्यवस्थापनाशी निगडित प्रशिक्षण सहभागी शिबिरार्थींना देण्यात येणार आहे. दि. ९ जून रोजी सकाळी ८.३० सहभागींची परीक्षा घेण्यात येणार असून, त्यामधून उत्कृष्ट विद्यापीठ संघाबरोबरच उत्कृष्ट शिबिरार्थींचीही निवड करण्यात येणार आहे. यावेळी प्रभारी प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, प्रभारी वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक डॉ. डी. के. गायकवाड, डॉ. जे. पी. जाधव, डॉ. सुमेधा साळुंखे, विश्वजित देसाई, आदी उपस्थित होते.

### मोबाईल ॲप

सर्व शिबिरार्थींची ऑनलाईन नोंदणी करण्यात आली. प्रत्येक सहभागी शिबिरार्थीला बार कोड असणारे ओळखपत्र देण्यात येणार येईल. त्याशिवाय 'आव्हान-२०१७' या नावानेच अँड्रॉईड अॅप्लिकेशनही तयार करण्यात आले आहे. यामध्ये शिबिराचे वेळापत्रक, प्रशिक्षणाचे ठिकाण, निवास व्यवस्था, आदी शिबिरार्थींना आवश्यक सर्व माहिती उपलब्ध करुन देण्यात आली आहे. शिबिर कालावधीतील घडामोडींची छायाचित्रे वगैरेही यावर उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत. कोल्हापूर शहरातील पर्यटनस्थळांची माहिती दिली आहे. त्याशिवाय, सर्व सहभागींना प्रमाणपत्रेही डिजिटल स्वरुपातच प्रदान करण्यात येणार आहेत.

1 JUN 2017

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठात आजपासून 'आव्हान-२०१७' ला प्रारंभ

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

शिवाजी विद्यापीठात गुरुवार, १ जूनपासून 'आव्हान-२०१७' या दहादिवसीय राज्यस्तरीय आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण शिबिरास प्रारंभ होत आहे. यामध्ये राज्यभरातील १८ विद्यापीठांमधील सुमारे १२२२ राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक सहभागी होणार आहेत, अशी माहिती कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, प्रशिक्षण शिबिरास गुरुवारी सकाळी ९ वाजल्यापासून प्रारंभ होत असला, तरी औपचारिक उद्घाटन समारंभ शुक्रवार (२ जून) रोजी सायंकाळी ४ वाजता होणार आहे. कोल्हापूर परिक्षेत्राचे पोलीस महानिरीक्षक विश्वास नांगरे-पाटील प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. शनिवार (दि. १० जून) रोजी शिबिराचा समारोप होणार असून महाराष्ट्राचे राज्यपाल तथा कुलपती विद्यासागर राव प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. अखेरच्या दिवशी शिबिरार्थींची त्यांच्या प्रशिक्षणावर आधारित रॅलीही शहरातून काढण्यात येणार आहे.

प्रशिक्षण शिबिराच्या आयोजनाची सर्व तयारी पूर्ण झाली असून, प्रशिक्षण देण्यासाठी राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाचे (एन.डी.आर.एफ.) चाळीस प्रशिक्षक दाखल झाले आहेत.



कुलगुरू म्हणाले, या दहा दिवसांत भूमी व जल यांच्यावर उद्‌भवणाऱ्या विविध आपत्तींच्या व्यवस्थापनाशी निगडित प्रशिक्षण सहभागी शिबिरार्थींना देण्यात येणार आहे. ९ जून रोजी सकाळी ८.३० ते १२.३० या वेळेत सहभागींची परीक्षा घेण्यात येणार असून त्यामधून उत्कृष्ट विद्यापीठ संघाबरोबरच उत्कृष्ट शिबिरार्थींचीही निवड करण्यात येणार आहे.

'आव्हान'मध्ये मोठ्या प्रमाणात माहिती तंत्रज्ञानाचा वापर करणारे शिवाजी विद्यापीठ पहिले विद्यापीठ ठरल्याची माहिती देत, कुलगुरू म्हणाले, यावेळी सर्व शिबिरार्थींची ऑनलाईन नोंदणी करण्यात आली. प्रत्येक सहभागी शिबिरार्थीला बारकोड असणारे ओळखपत्र देण्यात येणार येईल. त्याशिवाय 'आव्हान-२०१७' नावानेच ॲन्ड्रॉईड ॲप्लिकेशनही तयार करण्यात आले असून त्यावर वेळापत्रक, प्रशिक्षणाचे ठिकाण, निवास व्यवस्था आदी शिबिरार्थींना आवश्यक सर्व माहिती उपलब्ध करून देण्यात आली आहे. शिबिर कालावधीतील घडामोडींची छायाचित्रे वगैरेही यावर उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. त्याशिवाय, सर्व सहभागींना प्रमाणपत्रेही डिजिटल स्वरूपातच प्रदान करण्यात येणार आहे. पत्रकार परिषदेला प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, प्रभारी वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक डॉ. डी. के. गायकवाड, डॉ. जे. पी. जाधव, डॉ. सुमेधा साळुंखे, विश्वजित देसाई आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
01 JUN 2017
महाराष्ट्र टाईम्स

# विद्यापीठ तपासणार गुळाची गुणवत्ता

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

'शिवाजी विद्यापीठात गूळ गुणवत्ता तपासणी केंद्र सुरू करण्यासाठी महाराष्ट्र सरकारच्या राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान आयोगाकडे प्रस्ताव पाठवला जाईल. आयोगाची मान्यता मिळाल्यानंतर केंद्र सुरू होईल. केंद्रात गुळाच्या गुणवत्तेसंबंधी प्रमाणपत्र देण्यात येईल. याशिवाय उत्पादकांना गूळ निर्मितीचे शास्त्रीय प्रशिक्षण दिले जाईल', अशी माहिती कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी बुधवारी पत्रकार परिषदेत दिली.

**तपासणी केंद्र सुरु होणार**

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, 'कोल्हापूरच्या गुळाची वेगळी ओळख आहे. मात्र, अलिकडे त्याचा दर्जा खालावल्याच्या तक्रारी आहेत. काही कंपन्या दर्जाहिन गूळ कोल्हापुरीच्या नावाने विकत आहेत. गूळ उत्पादनात तंत्रज्ञानचा वापर नाही. पारंपरिक पद्धतीने चालवल्या जाणाऱ्या गुऱ्हाळ घरात गूळ बनविण्याचे एकच मापदंड नाही. त्यामुळे प्रत्येक गुऱ्हाळघरनिहाय गुळाची चव वेगवेगळी लागते. कोल्हापुरी नावाने इतर ठिकाणचा गूळ विकला जातो. हे चित्र बदलून कोल्हापूर गुळाची मूळ चव कायम राहावी आणि उत्पादकांनी गुणवत्ता पूर्ण गूळ तयार करावा, त्याला चांगला भाव मिळावा यासाठी मार्गदर्शन होईल.'

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, 'मंगळवारी विद्यापीठात जिल्हयातील गूळ उत्पादकांसोबत बैठक झाली.



बैठकीस ज्येष्ठ शास्त्रज्ञ व राज्य सरकारच्या राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान आयोगचे अध्यक्ष पद्मश्री डॉ. अनिल काकोडकर यांची प्रमुख उपस्थिती होती. बैठकीत शिवाजी विद्यापीठ, तंत्रज्ञान आयोगच्या सहकार्याने कोल्हापुरी गुळाच्या संदर्भात चर्चा झाली. संशोधन, प्रक्रिया, गुणवत्ता नियंत्रण, प्रक्रिया विकास याविषयी आधुनिक तंत्रज्ञानाधारीत गुऱ्हाळाचा पथदर्शी प्रकल्प उभारण्याचा निर्णय झाला. त्यास डॉ. काकोडकर यांनी आयोगाकडून मदत करण्याचे आश्वासन दिले आहे. बैठकीत मुंबईच्या इन्स्टिट्यूट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजीचे (आयसीटी) कुलगुरू पद्मश्री डॉ. जी. डी. यादव यांनी टेलिकॉन्फरन्सिंगद्वारे पूर्णवेळ सहभाग घेत मार्गदर्शन केले. कोल्हापुरी गुळास भौगोलिक मानांकन (जी. आय.) मिळाले. मात्र दर्जाकडे विशेष लक्ष दिले नाही. त्यामुळे गुणवत्ता सुधारण्यासाठी तंत्रशुध्द मार्गदर्शनासाठी केंद्र सुरू करण्यात येईल.'

### अभ्यासक्रमही सुरू करणार

'दर्जेदार, निर्यातक्षम गूळ कसा तयार करावा, गूळ उत्पादनात अत्याधुनिक तंत्रज्ञाचा वापर कसा करावा यासंबंधीचा पंधरा दिवस ते एक वर्ष अशा कालावधीचा अभ्यासक्रम तयार केला जाईल. त्या अभ्यासक्रमास विद्यार्थ्यांसह उत्पादकांनाही प्रवेश दिला जाईल', असे डॉ. शिंदे यांनी सांगितले.

1 JUN 2017 लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठात गूळ गुणवत्ता तपासणी केंद्र

## देवानंद शिंदे; राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान आयोगाचे सहकार्य

लोकमत न्यूज नेटवर्क

◆ कोल्हापुरी गुळाची अशी कोणती वैशिष्ट्ये आहेत, जी त्याला इतर ठिकाणच्या गुळापासून वेगळे दर्शवितात, याचा अभ्यास करणे आणि शेतकरी व गूळ उत्पादकांसाठी गुणवत्ता नियंत्रणविषयक तसेच संशोधनविषयक सुविधा निर्माण करण्याविषयी चाचपणी करणे या दिशेने काम करण्याची गरज लक्षात घेऊन शिवाजी विद्यापीठ आणि राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान आयोगाने परस्पर सहकार्य करण्याचा निश्चय केला आहे

**कोल्हापूर** : शिवाजी विद्यापीठात गूळ गुणवत्ता तपासणी प्रयोगशाळा स्थापन करण्याचा तत्त्वत: निर्णय राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान आयोग (आरजीएसटीसी) यांच्या सहकार्याने मंगळवारी (दि. ३०) विद्यापीठात झालेल्या विशेष बैठक घेण्यात आला, अशी माहिती शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी बुधवारी झालेल्या पत्रकार परिषदेत दिली.

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, बाजारात कोल्हापुरी गुळाच्या नावाखाली सुमार दर्जाचा माल ग्राहकांच्या माथी मारला जातो. यासाठी मूळ कोल्हापुरी गुळा चा अभ्यास करणे आणि शेतकरी व गूळ उत्पादकांसाठी गुणवत्ता नियंत्रणविषयक तसेच संशोधनविषयक सुविधा निर्माण करण्याविषयी चाचपणी करणे या दिशेने काम करण्याची गरज लक्षात घेऊन शिवाजी विद्यापीठ आणि राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान आयोगाने परस्पर सहकार्य करण्याचा निश्चय केला आहे.

बैठकीस ज्येष्ठ शास्त्रज्ञ व महाराष्ट्र शासनाच्या राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान आयोगाचे अध्यक्ष पद्मश्री डॉ. अनिल काकोडकर यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी मुंबईच्या इन्स्टिट्यूट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजीचे (आयसीटी) कुलगुरु पद्मश्री डॉ. जी. डी. यादव यांनी टेलिकॉन्फरन्सिंगद्वारे पूर्णवेळ सहभाग घेतला व मार्गदर्शनही केले. तसेच बैठकीस ज्येष्ठ अणुशास्त्रज्ञ डॉ. शिवराम भोजे यांच्यासह ऊस शेतकरी, गूळ उत्पादकांसह पणन संघाचे पदाधिकारी, गूळ खरेदी-विक्री संघाचे पदाधिकारी, गुऱ्हाळघर संचालक तसेच गूळविषयक संशोधन करणाऱ्या संस्थांचे प्रतिनिधी, संशोधक, शिक्षक, आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पत्रकार परिषदेस प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, प्रभारी वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक डॉ. डी. के. गायकवाड, डॉ. जे. पी. जाधव, डॉ. सुमेधा साळुंखे, विश्वजित देसाई, आदी उपस्थित होते.

1 JUN 2017
पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठात गूळ तपासणी प्रयोगशाळा स्थापण्याचा निर्णय

## कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे; कोल्हापुरी गुळाला 'ग्लोबल मार्केट' निर्माण करण्याचे नियोजन

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठात गूळ गुणवत्ता तपासणी प्रयोगशाळा स्थापन करण्याचा तत्त्वतः निर्णय याबाबत झालेल्या एका महत्त्वपूर्ण बैठकीत घेण्यात आला असल्याची माहिती बुधवारी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी दिली. ज्येष्ठ शास्त्रज्ञ व महाराष्ट्र शासनाच्या राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान आयोगाचे अध्यक्ष पद्मश्री डॉ. अनिल काकोडकर यांच्या प्रमुख उपस्थितीत ही बैठक नुकतीच झाली.

शिवाजी विद्यापीठाच्या पुढाकाराने राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान आयोग (आरजीएसटीसी) यांच्या सहकार्याने कोल्हापुरी गुळासंदर्भात विविध बाजूंनी या बैठकीत चर्चा करण्यात आली. कोल्हापुरी गुळाला 'ग्लोबल मार्केट' निर्माण करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. तसेच गूळ निर्मितीबाबतचा अभ्यासक्रम विद्यापीठाच्या वतीने सुरू होणार असल्याचेही कुलगुरू डॉ. शिंदे यांनी स्पष्ट केले.

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, शिवाजी विद्यापीठात गुळाच्या अनुषंगाने संशोधन, प्रक्रिया, गुणवत्ता नियंत्रण, प्रक्रिया विकास याविषयी आधुनिक तंत्रज्ञानाधारित गुऱ्हाळाचा पथदर्शी प्रकल्प उभारण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यासाठी आरजीएसटीसी सर्वोतोपरी सहकार्य करेल, असे डॉ. काकोडकर यांनी आश्वासन दिले आहे.



कोल्हापुरी गुळाच्या संदर्भात धोरणात्मक व संशोधनात्मक काम करण्याविषयी कोल्हापूर परिसरातील शेतकरी, गूळ उत्पादकांसह सहकार, पणन, उद्योग क्षेत्रातील व्यक्तींसमवेत या बैठकीत चर्चा झाली. सुमारे तीन तास चाललेल्या या बैठकीत मुंबईच्या इन्स्टिट्यूट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजीचे (आयसीटी) कुलगुरू पद्मश्री डॉ. जी.डी. यादव यांनी टेलिकॉन्फरन्सिंगद्वारे पूर्णवेळ सहभाग घेतला व मार्गदर्शनही केले. या बैठकीस ज्येष्ठ अणुशास्त्रज्ञ डॉ. शिवराम भोजे यांच्यासह ऊस शेतकरी, गूळ उत्पादकांसह पणन संघाचे पदाधिकारी, गूळ खरेदी-विक्री संघाचे पदाधिकारी, गुऱ्हाळघर संचालक तसेच गूळविषयक संशोधन करणाऱ्या संस्थांचे प्रतिनिधी, संशोधक, शिक्षक आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या बैठकीच्या आयोजनामागील हेतू स्पष्ट करताना कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, बाजारात विविध कंपन्या कोल्हापुरी गुळाच्या नावाखाली सुमार दर्जाचा माल ग्राहकांच्या माथी मारत आहेत; मात्र, त्याला मूळ कोल्हापुरी गुळाच्या चवीची सर नाही. कोल्हापुरी

- गुळाला 'ग्लोबल मार्केट' निर्माण करण्याचे नियोजन
- गूळ निर्मितीचा सुरू होणार अभ्यासक्रम
- शेतकरी व विद्यार्थ्यांना कौशल्य प्रशिक्षणाची संधी
- कोल्हापुरी गुळाची खास पद्धतीसाठी जनजागृती

गुळाची अशी कोणती वैशिष्ट्ये आहेत, जी त्याला इतर ठिकाणच्या गुळापासून वेगळे दर्शवितात, याचा अभ्यास करणे आणि शेतकरी व गूळ उत्पादकांसाठी गुणवत्ता नियंत्रणविषयक तसेच संशोधनविषयक सुविधा निर्माण करण्याविषयी चाचपणी करणे या दिशेने काम करण्याची गरज लक्षात घेऊन शिवाजी विद्यापीठ आणि राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान आयोगाने परस्पर सहकार्य करण्याचा निश्चय केला आहे. तसेच, गुळासंदर्भातील अन्य संशोधन व पूरक व्यवस्थांबाबत विश्वसनीय व्यासपीठ निर्माण करावे, या हेतूने डॉ. काकोडकर यांनी या कामी पुढाकार घेतला असल्याचेही त्यांनी सांगितले. यावेळी उत्तम चवीच्या कोल्हापुरी गुळाच्या भौगोलिक मानांकनाचे (जी. आय.) निर्धारण झाले असले तरी या गुळाच्या ब्रँडिंगसाठी किमान दर्जा निर्धारणाचे निकष ठरविणे अत्यावश्यक आहे, असे मत या बैठकीय डॉ. काकोडकर यांनी व्यक्त करून एखाद्या उत्पादनाचे भौगोलिक मानांकन निश्चित झाले तरी मुख्यत्वे आर्थिक निकषांवर त्याचे बाजारातील अस्तित्व आणि टिकणे अवलंबून असते, असे त्यांनी बैठकीत स्पष्ट केले आहे. त्यामुळे आता शिवाजी विद्यापीठाकडून गुळाच्या दर्जेदार निर्मितीसाठी व्यासपीठ उपलब्ध करून दिले जात असल्याचे डॉ. शिंदे यांनी सांगितले.

पत्रकार परिषदेत गुळाच्या दर्जासबंधी पाच वर्षे संशोधन करत असलेल्या जैवतंत्रज्ञान अधिविभागाच्या प्रा.जे.पी. जाधव म्हणाल्या, ऊस उत्पादकांना साखर कारखान्यांखेरीजही उसाच्या उपयोजनाचे विविध पर्याय स्थानिक पातळीवर उपलब्ध होणे आवश्यक आहे. त्यामध्ये गूळ आणि त्यावर आधारित गूळ पावडर, चॉकलेट व आईस्क्रीमसारख्या उपउत्पादनांच्या निर्मितीकडे लक्ष देणे अनिवार्य आहे. गूळ पावडरला बाजारात सध्या मोठी मागणी वाढते आहे. गूळ आणि या पावडरच्या चवीत फरक असला तरी त्याचा दर्जा आणि त्यातील घटकांचे प्रमाण यांचे लाभ मात्र ग्राहकाला सारखेच मिळायला हवेत, यावर कटाक्ष असायला हवा. त्या दृष्टीने गूळ व गूळ पावडर यांची किमान दर्जानिश्चिती करणे, स्थानिक पातळीवर गूळविषयक प्रकल्पांची घटणारी संख्या वाढविणे, त्यांच्या अर्थकारणाला चालना देणे आणि गूळ पावडरबरोबरच अन्य उत्पादनांच्या निर्मितीसाठी पूरक सुविधांची निर्मिती करणे या गोष्टींवर भर देण्याची गरज आहे. त्याचप्रमाणे आयआयटी (मुंबई) यांनी विकसित केलेल्या तंत्रज्ञानाचा विकास व विस्तार यांवर नजीकच्या काळात भर देण्याची गरज आहे. याबाबत शेतकरी व विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्यासाठी अभ्यासक्रम सुरू केला जाणार आहे.

### 'आयसीटी'कडून कोल्हापुरी गुळाच्या दर्जा निश्चितीचे काम

आयसीटी (मुंबई) यांच्याकडून गूळ व गूळ पावडर यांची दर्जानिश्चिती व तंत्रज्ञानविषयक प्रकल्पाचे काम सहा महिन्यांत पूर्ण करावे, अशी अपेक्षा डॉ. काकोडकर यांनी याबाबत मंगळवारी (दि.३०) झालेल्या बैठकीत व्यक्त केली. याबाबत झालेल्या बैठकीत डॉ. जी.डी. यादव यांनी सांगितले की, गुळाच्या निर्मितीच्या संदर्भात आधुनिक व आदर्श तंत्रज्ञान निर्मितीचा प्रकल्प 'आयसीटी'ने हाती घेतला आहे. ता लवकराच लवकर पूर्ण करण्यास आमचे प्राधान्य राहील. कोल्हापुरी गुळाचा दर्जा व चव कायम राखण्याबरोबरच त्याची योग्य प्रतवारी करण्याकडेही आमचा कटाक्ष राहील. कोल्हापुरी गुळाच्या योग्य ब्रँडिंगसाठी आधुनिक तंत्रज्ञानाच्या विकसनाला पर्याय नाही. आयआयटी (मुंबई), आर.जी.एस.टी.सी. (महाराष्ट्र राज्य) आणि टाटा सेंटर फॉर टेक्नॉलॉजी अँन्ड डिझाईन यांच्या संयुक्त विद्यमाने वारणानगर येथील तात्यासाहेब कोरे इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरिंग अॅन्ड टेक्नॉलॉजी येथे उभारलेल्या गूळ प्रक्रिया व संशोधन प्रकल्पाविषयी तसेच विकसित करण्यात आलेल्या मोबाईल अॅप्लिकेशनविषयी प्रा. नरेंद्र शहा यांनी सादरीकरण केले. आयसीटीमध्ये संशोधन करण्यात येत असलेल्या गूळ प्रकल्पाबाबत प्रा. बी.एन. थोरात यांनी सादरीकरण केले.

यावेळी झालेल्या चर्चेत डॉ. शिवराम भोजे यांच्यासह महाराष्ट्र शासनाच्या पणन विभागाचे निवृत्त संचालक श्री. दिनेश ओहूळकर, वारणानगर टीकेआयईटीचे प्रा. एस.व्ही. अणेकर, श्री. दीपक गुप्ते, श्री. निकेत जोशी, डॉ. ए.व्ही. सप्रे, अधिष्ठाता प्रा. पी.एस. पाटील, प्रा. ए.एम. गुरव, आरजीएसटीसीचे विद्यापीठ समन्वयक प्रा. एस.आर. पाटील, श्री छत्रपती शाहू सहकारी गूळ खरेदी-विक्री संघाचे राजाराम पाटील, शेतकरी प्रतिनिधी शिवाजी पाटील व श्री. बाळासाहेब पाटील आदींनी सहभाग घेतला. कुलसचिव डॉ. व्ही.डी. नांदवडेकर यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
01 JUN 2017
सकाळ

## विद्यापीठात उभारणार गूळ संशोधन केंद्र

» पान १ वरून

डॉ. जी. डी. यादव यांनी मार्गदर्शन केले. कुलगुरू शिंदे म्हणाले, "गूळ म्हणजे काय हे ठरविण्याचे मापदंड नाहीत. काही शेतकऱ्यांनी संशोधकांच्या पुढे जाऊन प्रश्न उपस्थित केले आणि उपायही सुचविले. गुळावर संशोधन करणाऱ्या डॉ. जाधव यांनी महत्त्वाचे मुद्दे मांडले. गुळाचे स्टँडर्ड (मोजमाप) ठरविले पाहिजे. त्याचा दर्जा ठरविला पाहिजे. त्यामध्ये कोणते घटक किती प्रमाणात असले पाहिजेत,. यावर आयआयटीच्या पंधरा पीएच.डी.प्राप्त विद्यार्थ्यांनी अभ्यास केला आहे. त्याचा संदर्भ येथे दिला. यानंतर कोल्हापुरी गुळाचा दर्जा ठरविण्यावर एकमत झाले. मूळ कोल्हापुरी गुळाची ओळख हरवू नये, यासाठीच आयोगाच्या माध्यमातून विद्यापीठात गूळ संशोधन आणि गुणवत्ता तपासणी केंद्र उभारण्याचा निर्णय झाला."

डॉ. जाधव म्हणाले, "गुळाचा दर्जा ठरविण्याचे काम केंद्रामार्फत होईल. कोल्हापुरातील गुळाची शुद्ध पावडरही केली जाणार आहे. मूळ कोल्हापूरचे शेतकरी तांत्रिक ज्ञानात कमकुवत असले तरीही त्यांनी कौशल्यावर दर्जेदार उत्पादन केले. ते पुढे टिकले नाही. तेच कौशल्य केंद्राच्या माध्यातून देण्याचा प्रयत्न करणार आहोत."

# विद्यापीठात उभारणार गूळ संशोधन केंद्र

## कुलगुरू : गुणवत्ता तपासणीही; राजीव गांधी आणि तंत्रज्ञान आयोगाचे सहकार्य

**सकाळ वृत्तसेवा**



कोल्हापूर, ता. ३१ : राजीव गांधी विज्ञान आणि तंत्रज्ञान आयोगाच्या सहकार्यातून शिवाजी विद्यापीठात गूळ संशोधन आणि गुणवत्ता तपासणी केंद्र उभारले जाणार आहे. नॅनो टेक्नॉलॉजी येथे कालच बैठक झाली. त्यात शेतकरी, गूळ उत्पादक आणि या आयोगाचे अध्यक्ष्य तथा ज्येष्ठ अणुशास्त्रज्ञ डॉ. अनिल काकोडकर यांच्या उपस्थितीत हा निर्णय

यांनी आज पत्रकार परिषदेत दिली.

जगप्रसिद्ध कोल्हापुरी गुळाचा सध्या दर्जा खालावल्याचे दिसून येत आहे. इतरत्र तयार होणारा गूळ 'कोल्हापुरी' नावाखाली विकला जात आहे. यासाठी डॉ. जे. पी. जाधव यांनी विशेष संशोधन सुरू केले. आयआयटीच्या पुढाकारातूनच गुळाची गुणवत्ता ठरविण्यासाठी उत्पादक, शेतकरी आणि संशोधकांची बैठक झाली. बैठकीसाठी शास्त्रज्ञ डॉ. काकोडकर उपस्थित होते. व्हीसीवरून पद्मश्री



### शुद्ध गूळ पावडर मिळणार

सध्या बाजारात साखरमिश्रित गूळ पावडर मिळते. यापुढे शुद्ध गूळ पावडर तयार केली जाईल. गूळ पावडर सहज हाताळता येईल. त्यातून तिचा वापर वाढेल. गुळाचे आइस्क्रीमही तयार केले जाणार आहे. दर्जेदार गुळामुळे दरही चांगला मिळेल. उत्पादन वाढेल. गूळ 'टॉनिक' म्हणून वापरता येईल, असाही विश्वास डॉ. जाधव यांनी व्यक्त केला.

1 JUN 2017

पुण्यनगरी

[illegible] कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठात होणार गूळ गुणवत्ता तपासणी केंद्र

## कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांची माहिती

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

शिवाजी विद्यापीठात गूळ गुणवत्ता तपासणी प्रयोगशाळा स्थापन करण्याचा तत्त्वतः निर्णय मंगळवारी विद्यापीठात झालेल्या बैठकीत घेण्यात आला. ज्येष्ठ शास्त्रज्ञ आणि महाराष्ट्र शासनाच्या राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान आयोगाचे अध्यक्ष पद्मश्री डॉ. अनिल काकोडकर यांच्या प्रमुख उपस्थितीत ही बैठक झाली, अशी माहिती कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी बुधवारी पत्रकार परिषदेत दिली.

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, शिवाजी विद्यापीठाच्या पुढाकाराने राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान आयोग (आरजीएसटीसी) यांच्या सहकार्याने कोल्हापुरी गुळासंदर्भात विचारविमर्श करण्यासाठी ही विशेष बैठक आयोजित करण्यात आली होती. विद्यापीठाच्या नॅनो-सायन्स व तंत्रज्ञान केंद्राच्या सभागृहात झालेल्या या बैठकीच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे होते.

डॉ. अनिल काकोडकर म्हणाले, उत्तम चवीच्या कोल्हापुरी गुळाच्या भौगोलिक मानांकनाचे (जी.आय.) निर्धारण झाले असले, तरी या गुळाच्या ब्रँडिंगसाठी किमान दर्जा निर्धारणाचे निकष ठरविणे अत्यावश्यक आहे. एखाद्या उत्पादनाचे भौगोलिक मानांकन निश्चित झाले, तरी मुख्यत्वे आर्थिक निकषांवर त्याचे बाजारातील अस्तित्व आणि टिकणे अवलंबून असते. ऊस उत्पादकांना साखर कारखान्यांखेरीजही उसाच्या उपयोजनाचे विविध पर्याय स्थानिक पातळीवर उपलब्ध होणे आवश्यक आहे. त्यामध्ये गूळ आणि त्यावर आधारित गूळ पावडर, चॉकलेट व तत्सम उपउत्पादनांच्या निर्मितीकडे लक्ष देणे अनिवार्य आहे. गूळ पावडरला बाजारात सध्या मोठी मागणी वाढत आहे. गूळ व गूळ पावडर यांची किमान दर्जानिश्चिती करणे, स्थानिक पातळीवर गूळविषयक प्रकल्पांची घटणारी संख्या वाढवणे, त्यांच्या अर्थकारणाला चालना देणे आणि गूळ पावडरबरोबरच अन्य उत्पादनांच्या निर्मितीसाठी पूरक सुविधांची निर्मिती करणे या गोष्टींवर भर देण्याची गरज आहे.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आयोजित गूळ उत्पादकांच्या बैठकीत बोलताना डॉ. अनिल काकोडकर. शेजारी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, डॉ. जे. पी. जाधव प्रा. ज्योती जाधव.

मुंबईच्या इन्स्टिट्यूट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजीचे (आयसीटी) कुलगुरू पद्मश्री डॉ. जी. डी. यादव यांनी टेलिकॉन्फरन्सद्वारे सहभाग घेतला डॉ. जी.डी. यादव म्हणाले, गुळाच्या निर्मितीसंदर्भात आधुनिक व आदर्श तंत्रज्ञान निर्मितीचा प्रकल्प आयसीटीने हाती घेतला आहे. कोल्हापुरी गुळाचा दर्जा व चव कायम राखण्याबरोबरच त्याची योग्य प्रतवारी करण्याकडेही आमचा कटाक्ष राहील. कोल्हापुरी गुळाच्या योग्य ब्रँडिंगसाठी आधुनिक तंत्रज्ञानाच्या विकसनाला पर्याय नाही.

यावेळी आयआयटी (मुंबई), आर. जी.एस.टी.सी. (महाराष्ट्र राज्य) आणि टाटा सेंटर फॉर टेक्नॉलॉजी अ‍ॅन्ड डिझाईन यांच्या संयुक्त विद्यमाने वारणानगर येथील तात्यासाहेब कोरे इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरिंग अ‍ॅन्ड टेक्नॉलॉजी येथे उभारलेल्या गूळ प्रक्रिया व संशोधन प्रकल्पाविषयी तसेच विकसित करण्यात आलेल्या मोबाईल अ‍ॅप्लिकेशनविषयी प्रा. नरेंद्र शहा यांनी सादरीकरण केले. आयसीटीमध्ये संशोधन करण्यात येत असलेल्या गूळ प्रकल्पाबाबत प्रा. बी. एन. थोरात यांनी सादरीकरण केले.

यावेळी झालेल्या चर्चेत महाराष्ट्र शासनाच्या पणन विभागाचे निवृत्त संचालक दिनेश ओहूळकर, वारणानगर टीकेआयईटीचे प्रा. एस. व्ही. अणेकर, दीपक गुप्ते, निकेत जोशी, डॉ. ए. व्ही. सप्रे, अधिष्ठाता प्रा. पी. एस. पाटील, प्रा. ए. एम. गुरव, आरजीएसटीसीचे विद्यापीठ समन्वयक प्रा. एस.आर. पाटील, श्री छत्रपती शाहू सहकारी गूळ खरेदी-विक्री संघाचे राजाराम पाटील, शेतकरी प्रतिनिधी शिवाजी पाटील व बाळासाहेब पाटील आदींनी सहभाग घेतला.

E 1 JUN 2017

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठात गूळ गुणवत्ता तपासणी केंद्रास मान्यता

## कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांची माहिती, बैठकीत निर्णय, कोल्हापुरी गुळाचा दर्जा सुधारण्यासाठी प्रयत्न

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठात एमआयटी आणि आयसीटीच्या सहकार्याने गूळ गुणवत्ता तपासणी केंद्र उभारणीसाठी तत्वत: मान्यता देण्यात आली आहे. हा निर्णय शिवाजी विद्यापीठात डॉ. काकोडकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत घेण्यात आल्याची माहिती कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, कोल्हापुरी गुळाची ख्याती जगभर पसरली आहे. त्यामुळे इतर भागातील गूळ उत्पादक आपला गूळ 'कोल्हापुरी गूळ' म्हणून बाजारात विक्री करीत आहेत. या गुळाला कोल्हापुरी गुळासारखी चव नाही, त्यामुळे



कोल्हापुरी गूळ बदनामीच्या भोवऱ्यात सापडला आहे. सध्या मात्र शेतकरी आपापल्या पध्दतीने गूळ तयार करीत असल्याने गुळाचा दर्जा घसरला आहे. तसेच गुळाला बुरशी येणे, पाणी सुटणे यासारखे प्रकार पाहावयास मिळतात. वर्षभर हा गूळ टिकत नसल्याच्या तक्रारीही ग्राहकांमधून येत आहेत. त्यामुळे कोल्हापुरी गुळाला जागतिक बाजारपेठ निर्माण करून देण्यासाठी गूळ उत्पादनामध्ये तंत्रज्ञानाचा वापर करण्याचा निर्णय डॉ. काकोडकर यांच्याबरोबर झालेल्या बैठकीत घेण्यात आला. या बैठकीमध्ये जवळपास ५० शेतकरी उपस्थित होते. या शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांचे निरसन डॉ. काकोडकर यांनी केले. बैठकीस ज्येष्ठ अणुशास्त्रज्ञ डॉ. शिवराम भोजे यांच्यासह ऊस शेतकरी, गूळ उत्पादकांसह पणन संघाचे पदाधिकारी, गूळ खरेदी–विक्री संघाचे पदाधिकारी, गुऱ्हाळघर मालक तसेच गूळविषयक संशोधन करणाऱ्या संस्थांचे प्रतिनिधी, संशोधक, शिक्षक उपस्थित होते.

### प्रस्ताव शासनाला पाठवणार

शिवाजी विद्यापीठात 'गुळ गुणवत्ता तपासणी केंद्र' उभारणीसाठी डॉ. अनिल काकोडकर यांनी तत्वत: मान्यता दिली आहे. त्यामुळे या केंद्राचा रीतसर प्रस्ताव शासनाला येत्या काही दिवसात पाठवला जाणार आहे. या प्रस्तावाला शासनाची मंजुरी मिळाल्यानंतरच या केंद्राच्या उभारणीचे काम सुरू होणार आहे.

### आयसीटीच्या सहकार्याने गुळाची पावडर तयार होणार

गुळापासून वेगवेगळे पदार्थ तयार केले जातात. मात्र गूळ हा चिकट पदार्थ असल्याने आजतागायत गुळाची पावडर तयार केली जात नसे. विद्यापीठात उभारण्यात येणाऱ्या गूळ गुणवत्ता तपासणी केंद्रात मात्र आयसीटीच्या सहकार्याने गुळाची पावडर तयार करण्याचा निर्णय घेण्यात आला. या निर्णयाला पूर्णपणे सहकार्य करण्याचे आश्वासन आयसीटीचे कुलगुरू डॉ. जी. डी. यादव यांनी टेलिकॉन्फरन्सिंगद्वारे दिले

### शास्त्रशुद्ध पद्धतीचे मिळणार धडे

गुळाला पूर्वी 'टॉनिक' समजले जायचे. सध्या गुळामध्ये केमिकलचे प्रमाण वाढत असल्याने, दिवसेंदिवस गुळातील जैविक घटक नाश पावत चालले असल्याचे संशोधनाअंती सिध्द झाले आहे. त्यामुळे शास्त्रशुद्ध पध्दतीने गूळ कसा तयार करायचा याचे धडे गूळ गुणवत्ता तपासणी केंद्राद्वारे दिले जाणार आहेत.

E 1 JUN 2017

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# अभियांत्रिकी प्रवेश ५ जूनपासून

## विद्यापीठात पदवी, प्रथम वर्षाचे वर्ग १ ऑगस्टपासून सुरू

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

बारावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांपैकी अनेक विद्यार्थ्यांना अभियांत्रिकी पदवीच्या शिक्षणासाठी प्रवेश घ्यावयाचा असतो. या विद्यार्थ्यांसाठी अभियांत्रिकीच्या प्रथम वर्षाच्या प्रवेश प्रक्रियेला ५ जूनपासून सुरुवात होणार आहे, अशी माहिती तंत्रशिक्षण संचालनालयाच्या सामायिक प्रवेशपूर्व परीक्षा कक्षातर्फे देण्यात आली आहे.

शिवाजी विद्यापीठ कार्यक्षेत्रात ३४ अभियांत्रिकी महाविद्यालय असून या ठिकाणी प्रथम वर्षासाठी १३ हजार जागा आहेत. यावर्षी प्रवेश प्रक्रियेच्या तीन फेऱ्या होणार आहेत. यासाठी कोल्हापूर जिल्ह्यात चार सुविधा केंद्रे असणार आहेत. सर्व प्रवेश प्रक्रिया संपवून १ ऑगस्ट रोजी अभियांत्रिकी पदवी प्रथम वर्षाचे वर्ग भरणार आहेत. तर शासकीय, अनुदानित महाविद्यालयांतील रिक्त असणाऱ्या जागांसाठी दि. ३ ऑगस्टला जादा फेरी घेण्यात येणार आहे.

बारावी उत्तीर्ण असलेल्या आणि अभियांत्रिकी विद्याशाखेतील प्रवेशासाठी इच्छुक असलेल्या विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज करावयाचे आहेत. विद्यार्थ्यांनी www.dtemaharashtra.gov.in/fe2017 या संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज भरावयाचे आहेत. प्रवेश अर्ज भरणे आणि कागदपत्रांची छाननी ५ ते १७ जून या कालावधीत होणार आहे. कच्च्या गुणवत्ता यादीची प्रसिद्धी १९ जून आणि पक्की गुणवत्ता यादी २२ जूनला प्रसिद्ध होईल. प्रवेशाच्या पहिल्या फेरीसाठी रिक्त जागांची माहिती २२ जूनला मिळणार आहे. २३ ते २६ जून या कालावधीत विद्यार्थ्यांनी विकल्प भरावयाचे आहेत.



प्रवेशासाठी पात्र ठरलेल्यांची पहिली यादी २८ जूनला प्रसिद्ध होईल. विकल्प भरण्याची दुसरी फेरी ५ ते ८ जुलैपर्यंत होणार आहे. प्रवेशासाठी पात्र ठरलेल्यांची दुसरी यादी १० जुलैला जाहीर होईल. यानंतर तिसऱ्या फेरीसाठीची रिक्त जागांची माहिती १६ जुलैला मिळणार आहे. १६ ते १९ जुलै या कालावधीत विकल्प बदलता येणार आहेत. प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या तिसरी यादी २१ जुलै रोजी प्रसिद्ध होणार आहे.

# पीएच.डी.साठी ११२ जागा

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

गत वर्षी एम.फिल. पीएच.डी.साठीचे मार्गदर्शक निकष यूजीसीने बदलल्याने गतवर्षी प्रवेश प्रक्रिया राबवण्यात आली नव्हती.

यंदा शिवाजी विद्यापीठाकडून एम.फिल. आणि पीएच.डी. अभ्यासक्रमासाठी प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येत असून संशोधनविषयक या दोन्ही अभ्यासक्रमांसाठी एकूण ११२ जागा उपलब्ध आहेत. त्यासाठी विद्यापीठाकडे ५ हजार ७४ अर्ज दाखल झाले आहेत.

विद्यापीठ अनुदान आयोगाकडून (यूजीसी) निकषांमध्ये एम.फिल. पीएच.डी.च्या मार्गदर्शक निकषांमध्ये काही बदल केले होते. या बदलाच्या प्रक्रियेला उशीर झाल्याने गेल्यावर्षी विद्यापीठाकडून प्रवेश प्रक्रिया राबविण्यात आली नव्हती. या वर्षी ही प्रवेशप्रक्रिया राबविली जात आहे. अभ्यासक्रमाच्या २२ विषयांसाठी २११ आणि पीएच.डी.च्या ४७ विषयांची ७०१ इतकी प्रवेश क्षमता आहे. अभ्यासक्रमांसाठी ऑनलाईन अर्ज करण्याची मुदत २४ एप्रिल ते २० मे दरम्यान होती. या कालावधीत एम.फिल.साठी २६० आणि पीएच.डी.साठी ४१५१ अर्ज दाखल झाले आहेत. ऑनलाईन अर्जाची स्थळप्रत विद्यापीठाकडे जमा करण्याची मुदत २५ मेपर्यंत होती. ही मुदत ३ जूनपर्यंत वाढविण्यात आली आहे. दरम्यान, या वर्षीच्या एम.फिल., पीएच.डी. अभ्यासक्रमासाठी २०, २१ आणि २२ जूनला प्रवेश परीक्षा घेण्याची तयारी सुरू आहे. ऑफलाईन पद्धतीने ओएमआर सीटद्वारे परीक्षा घेण्यात येणार आहे.

जुलै अखेरपर्यंत प्रक्रिया पूर्ण करणार अभ्यासक्रमांच्या प्रवेश परीक्षांसाठी प्रश्नपत्रिका, केंद्रनिश्चिती आदी स्वरूपांतील तयारी करून जूनच्या तिसऱ्या आठवड्यात प्रवेश परीक्षा घेण्यात येणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
1 JUN 2017
महाराष्ट्र टाईम्स

# 'व्यक्तिमत्त्व विकासासाठी संवाद कौशल्ये महत्त्वाची'

कोल्हापूर : संस्थात्मक गुणात्मक वाढीसाठी व व्यावसायिक व्यक्तिमत्त्व विकासासाठी संवाद कौशल्ये महत्वाची भूमिका पार पाडत असतात, असे प्रतिपादन न्यू कॉलेजचे माजी उपप्राचार्य टी. आर. गुरव यांनी व्यक्त केले. शिवाजी विद्यापीठाच्या दूर शिक्षण केंद्रामार्फत 'सॉफ्ट स्किल फॉर सपोर्ट स्टाफ' या विषयावरील कार्यशाळेत ते बोलत होते. अध्यक्षस्थानी दूरशिक्षण केंद्राचे संचालक प्रा. डॉ एम. ए. अनुसे होते.

गुरव म्हणाले, 'घर, कार्यालय सहकारी यांच्या बरोबरच्या संवादातून आपले व्यक्तिमत्व सुसंस्कृत आहे किंवा नाही कळते. समजून न घेणे, ऐकून न घेणे, एखादी गोष्ट मनाविरुद्ध घडणे, अपेक्षा ठेवणे, गैरसमज, अहंकार, आणि प्रतिकार करणे आदी गोष्टीमुळे विसंवाद घडला जातो. प्रत्येकाने प्रत्येकाला समजून घेण्यासाठी आणि संवाद वाढविण्यासाठी व्यक्तीच्या व्यक्तिमत्वाचा आदर केला पाहिजे. बोलणाऱ्याच्या भावना समजून घेतल्या पाहिजे, लोकांना समजेल असे बोलले पाहिजे, देहबोलीच्या वापर सकारात्मक पद्धतीने केला पाहिजे, चांगला विचार आणि चांगली कृती महत्त्वाची आहे.

दुपारच्या सत्रामध्ये शिवाजी विद्यापीठाच्या वाणिज्य विद्याशाखेचे प्रभारी अधिष्ठाता प्रा. डॉ. ए. एम. गुरव यांनी ताण व्यवस्थापन या विषयावर सादरीकरण केले. कर्मचाऱ्यांचा कृतियुक्त सहभाग घेऊन ताणतणावाचे स्वरूप प्रकार व त्यावरील उपाय विशद केले. व्यावसायिक व कौटुबिंक जीवनातील गतिमानता व वैविध्यातून निर्माण होणाऱ्या ताणाचे वैशिष्टयेपूर्ण व्यवस्थापन करण्याचे स्वरुप स्पष्ट केले. माहिती तंत्रज्ञानाचा व्यक्तिगत व व्यावसायिक जीवनातील वाढता वापर लक्षात घेवून त्यासाठी आवश्यक असणाऱ्या नेटिकेटस् (नेट शिष्टाचार) या विषयी कर्मचाऱ्याचे उद्बोधन कार्यशाळेच्या तिसऱ्या सत्रात दूर शिक्षण केंद्राच्या समन्वयक डॉ. श्रीमती आर. यू. संकपाळ यांनी 'नेटिकेटस्' या विषयावर मार्गदर्शन केले.

चौथ्या सत्रामध्ये दूर शिक्षण केंद्राचे समन्वयक डॉ. विद्यानंद खंडागळे यांनी सायबर गुन्ह्यांचे स्वरूप, प्रकार व संभाव्य धोके याविषयी सुलभ पद्धतीने मार्गदर्शन केले. या कार्यशाळेत योगेश पोवार व एस. एस. बुवा यांनी कौटुंबिक ताणतणावबाबतीत नाटिका सादर केली. प्रास्ताविक उपकुलसचिव कॅप्टन (डॉ.) नितीन सोनजे यांनी केले, सूत्रसंचालन शुंभागी उदाळे व तेजस्विनी आळवेकर यांनी केले. आभार डॉ. नितीन रणदिवे यांनी मनले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
E 1 JUN 2017
लोकमत

# शुक्रवारी केंद्रीय प्रवेश प्रक्रियेबाबत मोफत मार्गदर्शन

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : तंत्रज्ञान अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ व दि इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनिअर्स, इंडिया कोल्हापूर लोकल सेंटर यांच्यातर्फे शुक्रवारी (दि. २ जून) दुपारी ३.३० ते ६.३० या वेळेत १२ वी (सायन्स) उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थी व त्यांच्या पालकांसाठी 'अभियांत्रिकी शिक्षणातील करिअरच्या संधी व केंद्रीय प्रवेश प्रक्रिया २०१७' या विषयावर तज्ज्ञांचे मार्गदर्शन केशवराव भोसले नाट्यगृह, कोल्हापूर येथे आयोजित करण्यात येणार आहे.

या कार्यक्रमामध्ये अभियांत्रिकीच्या विविध विद्याशाखा व त्यातील संधी तसेच केंद्रीय प्रवेश प्रक्रिया २०१७ याविषयी विस्तृत मार्गदर्शन व शंकानिरसन करण्यात येणार आहे.

तरी विद्यार्थी व पालकांनी या संधीचा पुरेपूर उपयोग करुन घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
1 JUN २०११
पुढारी

# मान्यताप्राप्त अभ्यासक्रमासच प्रवेश घ्यावा : शिवाजी विद्यापीठाचे आवाहन

**कोल्हापूर (प्रतिनिधी) :** शिवाजी विद्यापीठाची तसेच शासन व शिखर संस्थेची मान्यता नसलेल्या कोणत्याही अभ्यासक्रमास विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतल्यास त्याची जबाबदारी पूर्णपणे संबंधित विद्यार्थ्यांवर राहील. यासाठी विद्यापीठ जबाबदार राहणार नाही. त्यामुळे पालक व विद्यार्थ्यांनी शिवाजी विद्यापीठाची संलग्नता असलेल्या अभ्यासक्रमांस संकेतस्थळांवरून माहिती घेऊन खात्री झाल्यानंतरच प्रवेश घ्यावा आणि संभाव्य नुकसान टाळावे, असे आवाहन कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदवडेकर यांनी केले आहे.

01 JUN 2017 सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'आपत्ती व्यवस्थापन'ची आज विद्यापीठात सुरवात

## १२२२ विद्यार्थी : समारोपासाठी राज्यपालांची उपस्थिती

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. ३१ : राज्यातील १४ विद्यापीठांतील १२२२ विद्यार्थ्यांच्या आपत्ती व्यवस्थापन शिबिराची सुरवात उद्या (ता.१) पासून होत आहे. दहा दिवस सुरू राहणार आहे. शिबिराचे उद्घाटन दोन जूनला दुपारी चार वाजता विशेष पोलिस महानिरीक्षक विश्वास नांगरे पाटील यांच्या हस्ते लोककला केंद्रात होईल. समारोप दहा जूनला होणार आहे. राज्यपाल सी.विद्यासागर राव उपस्थित राहणार असल्याची माहिती कुलगुरू देवानंद शिंदे यांनी आज पत्रकार परिषदे दिली.

कुलगुरू शिंदे म्हणाले, "पाच ग्रुपच्या माधमातून विद्यार्थी शिबिरात सहभागी झाले आहेत. त्यांना नारंगी, पांढरा, हिरवा, निळा आणि जांभळ्या रंगाचे टीशर्ट दिले आहेत. त्यांच्या मार्गदर्शनासाठी मोबाइल ॲपही तयार केला आहे. विद्यार्थी विद्यापीठाच्या



कोणत्याही ठिकाणी असल्यास त्याला ॲप मार्गदर्शन करेल. ॲपवर कोल्हापूरच्या वैशिष्ट्यासह पर्यटनाचीही माहिती दिली आहे. त्यांना डिजिटल ओळखपत्र ही दिले जाणार आहे. प्रत्येक विद्यापीठातील वीस मुले आणि दहा मुली आणि त्यांचे दोन प्रशिक्षक आज विद्यापीठात दाखल झाले आहेत.

उद्या सकाळी नऊपासून त्यांचे प्रात्यक्षिक सुरू होणार आहे. जमिनीवरील आणि पाण्यातील प्रशिक्षण दिले जाणार असून, काही प्रशिक्षण राजाराम तलावात होणार आहे. एन.डी.आर.एफ.चे जवान-अधिकारी या विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्यासाठी विद्यापाठीत हजर झाले आहेत."

भविष्यात हेच विद्यार्थी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या माध्यमातून आपत्ती व्यवस्थापनात सहकार्य करतील असे सांगून कुलगुरू शिंदे पुढे म्हणाले," संपूर्ण शिबिराचे आयोजन राज्यपाल भवनातूनच झाले आहे. त्याची अंमलबजावणी विद्यापीठ करीत आहे. संपूर्ण शिबिरात विद्यार्थ्यांना वेगवेगळी बक्षिसे देण्याचे नियोजन आहे. बेस्ट विद्यापीठ, बेस्ट स्टुडंड यांची निवड केली जाणार आहे. समारोपापूर्वी शहरातून आपत्ती व्यवस्थापन जनजागृतीसाठी रॅलीही काढली जाणार आहे."

परिषदेस प्रभारी प्र कुलगुरू डॉ.डी.टी.शिर्के, एन.एस.एस.चे प्रमुख डी.के.गायकवाड, प्रभारी वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, प्रा. सुमेधा साळुंखे आदी उपस्थित होते.